Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.नं. ८३२-अ, फा.प्लॉ.नं. १७८,१७९,
ई बालभारती शेजारी आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020) 25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं/संशोधन/समकक्षता/४००९
पुणे – ४११००४
दिनांक – २८/०९/२०२६

प्रति
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय – समकक्षता / योग्यता प्रमाणपत्रबाबत..

संदर्भ – १) क्र.रा.मं/परीक्षा ३/ ३४८८, दिनांक - १७/०८/२०२६ रोजीचे पत्र.
२) क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/३५२५, दिनांक -१९/०८/२०२६ रोजीचे पत्र.
३) क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/३३३७, दिनांक - २३/०८/२०२४ रोजीचे पत्र.
४) क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/३३३८, दिनांक - २३/०८/२०२४ रोजीचे परीपत्रक.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, भारतातील व भारताबाहेरील शिक्षणसंस्थांचे विभागीय मंडळांकडून राज्यमंडळाकडे समकक्षतेसाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात. ज्या परीक्षा मंडळांना/संस्थाना राज्यमंडळामार्फत समकक्षता देण्यात आलेली आहे अशा मंडळ/संस्था यांची नावे राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली असून त्यानुसार संबधित मंडळ/संस्था यांच्या कडून योग्यतेसाठी विद्यार्थ्यांचे प्राप्त होणारे अर्ज पडताळणी करून नियमानुसार संबधितास योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही विभागीय मंडळामार्फत करण्यात यावी. तसेच ज्या परीक्षा मंडळांना/संस्थाना अद्याप राज्यमंडळामार्फत समकक्षता देण्यात आलेली नाही, अशी प्रकरणे मंडळाकडे समकक्षतेसाठी वेळोवेळी प्राप्त होतात. अशी प्रकरणे समकक्षता समितिसमोर अभिप्राय/ शिफारशीसाठी विभागीय मंडळाकडून राज्य मंडळाकडे सादर करण्यात येतात. तरी सदर प्रस्ताव सादर करताना पडताळणी सूचीनुसार आवश्यक सर्व कागदपत्रे पडताळून प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे. अपूर्ण प्रस्ताव सादर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सन २०२६-२७ साठी इ. ११ वी मध्ये योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. भारतीय, परदेशी विद्यार्थी – नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत, भारतीय, परदेशी विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क दि. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत, भारतीय, परदेशी विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क दि. १ डिसेंबर पासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज विभागीय मंडळास सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत सादर करणेबाबत सूचना संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भिय क्र. ३ व ४ पत्रानुसार आपणास योग्यता प्रमाणपत्र बाबत सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांचे काटेकोर पालन करावे. तसेच उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ नुसार मा. संचालक (माध्यमिक) यांचेमार्फत प्राप्त FYJC Online प्रवेशाचा data सर्व विभागीय मंडळांना पाठविण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचे बोर्ड/मंडळ नमूद आहे. सदर यादीमध्ये नमूद विद्यार्थ्यांचे बोर्ड पाहून योग्यता प्रमाणपत्राबाबतची आवेदन पत्र प्राप्त करून घेण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र प्राप्त झाले नाही त्यांचा पाठपुरावा करण्यात यावा. इ. ११ वी मध्येच विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र मिळेल अशी दक्षता घ्यावी.

ज्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी मध्ये काही अपरिहार्य कारणास्तव योग्यता प्रमाणपत्र मिळाले नाही अथवा इतर मंडळातून विद्यार्थ्याने थेट इ. १२ वी प्रवेश घेतला असेल अशा इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणा-या

विद्यार्थ्यांना सुद्धा तातडीने योग्यता प्रमाणपत्र मिळेल याबाबत पाठपुरावा करावा. इ. १२ वी परीक्षेसाठी आवेदन पत्रे सादर करावयाची अति विलंबाची दिनांक ३०/११/२०२६ पर्यंत आहे. तरी इ. १२ वी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणारे विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र दिनांक १५/१०/२०२६ पूर्वीच अंतिम करण्यात यावे. तसेच ज्या मंडळांना/संस्थाना राज्य मंडळामार्फत समकक्षता प्रदान केलेली नाही अशा विद्यार्थ्यांचे समकक्षता प्रस्ताव दिनांक १५/१०/२०२६ पूर्वीच राज्यमंडळास सादर करावेत म्हणजे सदर प्रस्तावावर वेळेत कार्यवाही पूर्ण करून विद्यार्थ्यांच्या आवेदन पत्र सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत योग्यता प्रमाणपत्राचा क्रमांक भरून आवेदन पत्र भरता येतील.

इ. १२ वी परीक्षेची आवेदन पत्र भरताना योग्यता प्रमाणपत्र क्रमांक भरणेची अट असल्याने संबधित विद्यार्थी आवेदन पत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र मिळविणे अनिवार्य आहे. योग्यता प्रमाणपत्राअभावी विद्यार्थ्यांना आवेदन पत्र भरता आले नाही तर किंवा चुकीचे आवेदन पत्र सादर केले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील. यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी. परीक्षेच्या ऐनवेळी विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र/समकक्षता मिळणेबाबतचे प्रस्ताव सादर होणार नाही तसेच एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व विभागीय मंडळांनी घ्यावी. तसेच सर्व विभागीय मंडळांनी याबाबत सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून कळवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळ कार्यालयास सादर करावा .

( मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने )

(डॉ दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४

**क्र.कोविमं/उ.मा./12 वी परीक्षा/ 3528**
**दिनांक - 01/10/2026**

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,**
**जिल्हा- सातारा, सांगली, कोल्हापूर.**

**विषय - समकक्षता / योग्यता प्रमाणपत्राच्या कार्यवाहीबाबत.**

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या समकक्षता / योग्यता प्रमाणपत्राबाबत वरील पत्राची नोंद घेवून योग्य ती कार्यवाही करणेत यावी.**

**(गजानन उकिर्डे),**
**प्र.विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**